# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग, आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई

**सामान्य परिचर्या व प्रसाविका प्रशिक्षण** (जी.एन.एम.)

प्रशिक्षण कालावधी ३ वर्षे

(महिला व पुरुष उमेदवारांकरिता)

# प्रवेश नियम पुस्तिका

# सन २०२५-२६

आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड,मुंबई- ४०० ००१

संकेतस्थळ - http://arogya.maharashtra.gov.in

ईमेल - ddhsnursingmumbai@gmail.com

ddhsnursing.dhs-mh@mah.gov.in

दुरध्वनी - ०२२- २२६२६७४०

**आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई**
**सामान्य परिचर्या व प्रसाविका प्रशिक्षण (जी.एन.एम.)**
**प्रवेश प्रकिया सन २०२५-२६**

**सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई यांच्या अधिनस्त असलेल्या परिचर्या प्रशिक्षण विद्यालय येथे सामान्य परिचर्या व प्रसाविका प्रशिक्षण (जी.एन.एम.) या ३ वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या जागांवर प्रवेश करण्यासाठी खालील कार्यपध्दती प्रसिध्द करण्यात येत आहे.**

१) **प्रस्तावना** :- सदर माहिती पुस्तिका नियम (Information Brochoure) हे महाराष्ट्र राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्थ आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत सर्व परिचर्या प्रशिक्षण संस्थामधील तीन वर्षे कालावधीच्या "सामान्य परिचर्या व प्रसाविका" (जी.एन.एम.)प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी लागु राहतील. सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश हे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेमार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून लागु करण्यात येत आहेत.

२) **व्याख्या**:-

क) **"शासन"** याचा अर्थ महाराष्ट्र शासन असा आहे.

ख) **"सार्वजनिक आरोग्य विभाग"** याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग

ग) **"आयुक्तालय"**याचा अर्थ आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य

घ) "**आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक (रा.आ.अ.)**" हे महाराष्ट्र राज्य शासनाच्या आरोग्य सेवा आयुक्तालयाचे प्रमुख होय.

च) **संचालक, आरोग्य सेवा, मुंबई** हे आरोग्य सेवा आयुक्तालयातील कार्यालय प्रमुख व सर्व विभागाचे प्रमुख होय.

छ) **उपसंचालक, आरोग्य सेवा (शुश्रृषा)** हे आरोग्य सेवा आयुक्तालयातील शुश्रृषा विभागाचे प्रमुख होय.

ज) **सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (शुश्रृषा)** हे आरोग्य सेवा आयुक्तालयातील शुश्रृषा विभाग प्रमुखास सहाय्य करणारे होय.

झ)**"परिचर्या प्रशिक्षण विद्यालय "** यांचा अर्थ आरोग्य सेवा आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य यांच्या अधिपत्याखालील परिचर्या विषयातील पदविका, पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणारी परिचर्या महाविद्यालय व परिचर्या प्रशिक्षण विद्यालय असा होय.

त्र) **सक्षम प्राधिकारी (Competent Authority)** म्हणजे राज्य स्तरावर आयुक्त (आरोग्य सेवा) व अभियान संचालक (रा.आ.अ.) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेली समिती आणि जिल्हास्तरावर जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेली समिती होय.

ठ )**"सामान्य परिचर्या व प्रसाविका" ( जीएनएम )** म्हणजे ग्रामिण ते शहरी भागात प्रतिबंधात्मक, उपचारात्मक, संवर्धनात्मक दर्जेदार सेवा पुरविण्यासाठी, व्यक्ती, कुटुंब आणि समाजास शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि अध्यात्मिक अशा सर्वांगीण आरोग्य सेवा देण्यास सक्षम असणा-या परिचारीकेचे परिचर्या प्रशिक्षण देणारा तीन वर्षाचा अभ्यासक्रम होय.

ड) **"भारतीय परिचर्या परिषद"** याचा अर्थ भारतीय परिचर्या परिषद अधिनियम १९४७ ( केंद्रीय अधिनियम १९४७ चा ४८ ) च्या कलम ३ (१) च्या तरतुदीनुसार स्थापन केलेली परिषद.

ढ) **"महाराष्ट्र परिचर्या परिषद"** याचा अर्थ महाराष्ट्र परिचर्या परिषद अधिनियम, १९६६ मधील कलम ३ (१) च्या तरतुदीनुसार स्थापन केलेली परिषद.

ण ) **महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई** हे राज्य स्तरावर परिचर्या अभ्यासक्रम राबविणे, परिक्षा घेणे, गुणवत्ता नियमन करणारी शासनाच्या अधिनस्त संस्था होय.

**३) निवड प्रकिया :-**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या द्वारे निवड प्रकिया राबविण्यात येईल.

**४) जिल्हा निहाय जागा वाटप:-**

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिनस्त असलेल्या २४ जीएनएम परिचर्या प्रशिक्षण विद्यालयामध्ये ४० या प्रमाणे खालील जागा वाटप करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | परिचर्या प्रशिक्षण संस्थेचे नाव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय,जि.रु. ठाणे | ४० |
| २ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.रु. रायगड | ४० |
| ३ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.रु. सातारा | ४० |
| ४ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.रु. सिंधुदुर्ग | ४० |
| ५ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.रु. रत्नागिरी | ४० |
| ६ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.रु. नाशिक | ४० |
| ७ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.रु. जळगाव | ४० |
| ८ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.रु. अहिल्यानगर | ४० |

| अ.क्र. | परिचर्या प्रशिक्षण संस्थेचे नाव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| ९ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.रु. नंदुरबार | ४० |
| १० | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, सा.रु.मालेगाव जि. नाशिक | ४० |
| ११ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.रु. जालना | ४० |
| १२ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.रु. परभणी | ४० |
| १३ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.रु. हिंगोली | ४० |
| १४ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.रु.बीड | ४० |
| १५ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.रु.नांदेड | ४० |
| १६ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.रु.धाराशिव | ४० |
| १७ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.रु.वाशिम | ४० |
| १८ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.सा.रु.अमरावती | ४० |
| १९ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.स्त्री.रु.अमरावती | ४० |
| २० | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.रु.चंद्रपुर | ४० |
| २१ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.रु.भंडारा | ४० |
| २२ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.रु.गडचिरोली | ४० |
| २३ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, जि.रु.गोंदिया | ४० |
| २४ | परिचर्या प्रशिक्षण विद्यालय,सा.रु.इचलकरंजी जि. कोल्हापुर | ४० |

टिप - दिव्यांग व्यक्तिंसाठी एकूण जागांपैकी ५ टक्के जागा आरक्षित असेल तसेच अनाथ व्यक्ति करीता अनाथ पदाची गणना पदभरतीच्या तसेच शैक्षणिक प्रवेशासाठी उपलब्ध पदसंख्येच्या १ % राहील. (शासन निर्णय क्रमांक - अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३ दि. २३.८.२०२१)

**५) प्रवेशित जागांचे आरक्षण:-**

- सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिनस्थ असलेल्या २४ जीएनएम परिचर्या प्रशिक्षण विद्यालय सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासुन प्रवेश प्रक्रिया राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे मार्फत राबविण्यात येईल.
- सदर जागा वाटपाबाबत पुरुष उमेदवारांचे प्रमाणक ९:१ ( ९महिला : १ पुरुष ) असे असेल
- एएनएम आरक्षणबाबतची निवड एएनएमच्या गुणवत्तेनुसार करण्यात येईल. एएनएम करिता संस्थानिहाय प्रवेश क्षमतेच्या ५ टक्के जागा आरक्षित राहतील.
- 

- **दिव्यांग आरक्षण :-**

  १ इंडियन नर्सिंग कॉन्सिल एफनं.१-५/२०१८आयएनसी दि.१९.०४.२०१९ च्या परिपत्रक नुसार "For Disabled candidates: ५% Disablity of locomotor to the tune of ४०% to ५०% of the lower extremity". नुसार कार्यवाही करण्यात येईल.

  २ इंडियन नर्सिंग कॉन्सिल एफनं.२२-१०/Unic-२०१९-INC दि.१८.०४.२०१९ च्या परिपत्रका नुसार "Candidate shall be medically fit.However, Colour Blind Candidates should be considered for admission to Nursing Courses subject to the condition that Colour corrective contact lens and spectacles are worn by such candidates". नुसार कार्यवाही करण्यात येईल.

**६) राखीव उमेदवारांसाठी खाली दर्शविल्यानुसार आरक्षण असेल -**

| अ.क्र. | प्रवर्ग | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती व बौध्द धर्मांतरीत अनुसूचित जाती (अ.जा) | १३.० |
| २ | अनुसूचित जमाती ( निर्देशित क्षेत्रांच्या बाहेर राहणा-यांसह) (अ.ज.) | ७.० |
| ३ | निरधि सूचित जमाती (अ) विमुक्त जाती) वि.जा. (अ) | ३.० |
| ४ | भटक्या जमाती - (ब) भ.ज. (ब) | २.५ |
| ५ | भटक्या जमाती - (क) भ.ज. (क) | ३.५ |
| ६ | भटक्या जमाती - (ड) भ.ज. (ड) | २.० |
| ७ | इतर मागास वर्ग (इमाव) | १९.० |
| ८ | आर्थिक दुर्बल घटक | १०.० |
| ९ | सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्ग **(सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक -बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-३ दि.११.३.२०२३ नुसार , शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशामध्ये १० टक्के आरक्षण विहीत करण्यात आलेले आहे. )** | १०.० |

**७) शैक्षणिक अर्हता:-**

- शासन पत्र क्रमांक प्रवेश-२०२३/प्र.क्र.४४०/सेवा-५ दि.१५.०६.२०२३ नुसार जीएनएम या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सर्वसाधारण तसेच मागासवर्गीय उमेदवारांसाठी १२ वी विज्ञान शाखेत ( जीवशास्त्र , भौतिकशास्त्र, रसायनशास्त्रसह) किमान ४५ टक्के गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक असेल.

**८) निवड झालेल्या उमेदवारांना कागदपडताळणी करीता सादर करावयाची कागदपत्रे:-**

- शाळा/ महाविद्यालय सोडल्याचा दाखला
- १० वी उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्र
- १२ वी उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्र
- अर्हताकारी परिक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण झाले त्याबाबतचे शाळा/ महाविद्यालयाचे प्रमाणपत्र ( Attempt Certificate)
- महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
- जन्म व भारतीय नागरिकत्वाचा दाखला (Age, Nationality Certificate)
- जात प्रमाणपत्र
- जातवैद्यता प्रमाणपत्र
- नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र
- शासकिय रुग्णालयातील सक्षम वैद्यकिय अधिकारी यांनी प्रमाणित केलेले वैद्यकिय प्रमाणपत्र ( सोबतच्या विहित नमुन्यानुसार)
- आधार कार्ड
- राखीव गटातील उमेदवारांनी त्यांची आवश्यक प्रमाणपत्रे/कागदपत्रे अर्जासोबत सादर करावीत.

वरील सर्व प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती प्रवेशाच्या वेळी आणणे आवश्यक आहे. तसेच संस्थेत दाखल होताना सर्व प्रमाणपत्रांच्या मुळ प्रतिची छाननी संस्थेमध्ये प्रवेश घेताना करण्यात येईल.

**सामान्य परिचर्या व प्रसाविका प्रशिक्षण (जी.एन.एम.) हा एकूण तीन वर्ष कालावधीचा अभ्यासक्रम पुर्णवेळ व नियमित असल्याने सदर प्रशिक्षणा दरम्यान इतर कोणत्याही शैक्षणिक अभ्यासक्रमास ( नियमित अथवा दुरस्थ ) प्रवेश घेता येणार नाही.**

**९) वयोमर्यादा:-**

दि.३१.०७.२०२५ रोजी उमेदवाराचे वय १७ वर्षापेक्षा कमी व ३५ वर्षापेक्षा जास्त असु नये.

**१०) शुल्क आकारणी:-**

निवड झालेल्या उमेदवारांना भोजन खर्च, पुस्तके, स्टेशनरी, गणवेश इत्यादी खर्च स्वत: करावा लागेल, तसेच नोंदणीशुल्क, परिक्षा शुल्क, एसएनए सदस्यता शुल्क यांचे विहित शुल्क संस्थेत भरणा करावा लागेल.

a) **शैक्षणिक शुल्क -**

या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक शुल्क हे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या दरानुसार राहील. निवड झालेल्या उमेदवारांना प्रथम शैक्षणिक वर्षाचे अभ्यासक्रम शुल्क प्रवेशाच्या वेळीच भरावे लागेल. त्यानंतर प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी निर्धारित शुल्क भरावे लागेल. प्रवेश शुल्क भरल्यानंतरच विद्यार्थ्यांचा प्रवेश ग्राहय धरल्या जाईल.

शासन पत्र क्रमांक नर्सिंग-२०२५/प्र.क्र.१०५/सेवा-५ (ई-१०५५०२४) दि.१७.४.२०२५ नुसार जीएनएम या अभ्यासक्रमासाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक शुल्क आकारण्यात येईल.

| अ.क्र. | शैक्षणिक शुल्काचा तपशिल | शुल्क |
|---|---|---|
| १ | प्रवेश शुल्क | रु.१५००/- |
| २ | पाठय शुल्क | रु.१०५०/- |
| ३ | ग्रंथालय अनामत ( परतावा योग्य) | रु. २०००/- |
| ४ | वस्तीगृह भाडे | रु.४०००/- |
| ५ | जिमखाना / कल्चरल शुल्क (वार्षिक) | रु.५००/- |
| ६ | ग्रथांलय शुल्क (वार्षिक) | रु. १०००/- |
| ७ | संकिर्ण (वार्षिक) | रु५००/- |
| | **एकुण** | **रु.१०५५०/-** |

**११) वसतीगृह सुविधा:-**

भारतीय परिचर्या परिषदेच्या मानकानुसार ३० % परिचर्या प्रशिक्षण विद्यालयातील जीएनएम प्रशिक्षणार्थीना संस्थेच्या वसतिगृहात राहणे आवश्यक आहे. तथापि, ज्या वसतीगृहातील इमारत राहण्या योग्य नसेल किंवा नूतनीकरण सुरु असल्याने वसतिगृहाची व्यवस्था होत नसल्यास संबंधित विद्यार्थ्यानीच्या पालकांनी त्यांच्या जबाबदारीवर वसतीगृहात न राहणे हा पर्याय स्वीकारला तर त्याबाबत रितसर पालकांच्या परवानगी व संमतीपत्रानुसार त्यांना नियमित विद्यालयात उपस्थित राहण्याच्या अटीवर अनिवासी प्रशिक्षणाची अनुमती देण्यात येईल .

जेवणासाठी विद्यार्थिनींना क्लब सिस्टीम द्वारे ठरवुन प्रतिमहा ठराविक रक्कम एकत्रिक (अंदाजे रु.१०००/- ते रु. १५००/-) जमा करुन शासनाच्या स्वयंपाकी यांचे कडुन स्वयंपाक करुन घेतला जाईल.

- विद्यार्थ्यांचा आहाराचा दर्जा राखण्यासाठी खालीलप्रमाणे आहार समिती गठीत करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अधिसेविका | अध्यक्ष |
| परिचर्या अधिकारी/वरिष्ठ पाठयनिर्देशिका/प्राचार्य | सदस्य |
| सहाय्यक अधिसेविका | सदस्य |
| रुग्णालयाचे आहार तज्ञ | सदस्य |
| वॉर्डन | सदस्य सचिव |
| विद्यार्थी प्रतिनिधी | सदस्य |

या समितीने विद्यार्थ्यांचे दैनंदिन आहार नियोजन व खर्चाचा ताळमेळ ठेवावा व त्याबाबतच्या नोंदी अद्यावत ठेवाव्यात. यासाठी "परिचर्या प्रशिक्षण विद्यालय उपहारगृह"या नावाने परिचर्या अधिकारी व विद्यार्थी प्रतिनिधी यांचे संयुक्त बॅक खाते उघडावे. दैनंदिन आहार नियोजनावर सर्व समिती सदस्यांच्या सहया बंधनकारक आहेत.

- वसतीगृहाचे दरवाजे साधारणतः कामकाजाचे तास पाहुन रात्री ८ नंतर बंद करावेत. त्यानंतर कोणासही प्रवेश देण्यात येऊ नये.
- दररोज सकाळी ७.३० व सकाळी ८ वाजता वसतिगृहात प्रार्थना, परिचर्या प्रतिज्ञा व राष्ट्रगीत घेऊन विद्यार्थ्यीनींची हजेरी घेऊन नोंद ठेवावी.
- वसतिगृहाच्या नियमाचे काटेकोरपणे पालन न केल्यास वसतिगृहातून काढून टाकले जाईल याची विद्यार्थी आणि पालकांनी नोंद घ्यावी.

**१२) विद्यावेतन:-**

निवड झालेल्या प्रशिक्षणार्थिंना शासन नियमाप्रमाणे अनुज्ञेय असलेले विद्यावेतन दरमहा दिले जाईल.

**१३) शिस्त व वर्तणुक:-**

**(अ)प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षण विद्यालय व रुग्णालयात पाळावयाचे नियम:-**

परिचर्या प्रशिक्षण हा अभ्यासक्रम इतर अभ्यासक्रमापेक्षा पूर्णतः वेगळा आहे . त्याअनूषंगाने परिचर्या प्रशिक्षण विद्यालयात विहित केलेले नियम प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना बंधनकारक आहेत. प्रत्यक्ष रुग्णावर प्रात्याक्षिक करावे लागते त्यामुळे प्रत्येक विद्यार्थिनी

परिचर्या अभ्यासक्रम जबाबदारीने व नियमित पुर्ण करणे आवश्यक आहे.यासाठी पालकांनी आपल्या पाल्याकडुन खालील नियमांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी. तसे प्रतिज्ञापत्र विद्यार्थी व पालकांनी रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रवेश घेतेवेळी सादर करावे.

१) विद्यार्थ्यांविरुध्द कोणत्याही गुन्हयाची नोंद किंवा न्यायालयीन प्रकरण प्रलंबीत असु नये. याबाबत खोटी माहिती दिल्याचे आढळुन आल्यास प्रशिक्षणार्थीला प्रशिक्षणातुन काढुन टाकण्यात येईल.

२) विद्यार्थ्यांना वर्गात व रुग्णालयामध्ये मोबाईल फोन वापरण्यास सक्त मनाई आहे.

३) प्रशिक्षणार्थीना महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांनी नेमुन दिलेल्या रजे व्यतिरीक्त कोणतीही रजा अनुज्ञेय राहणार नाही. तसेच प्रशिक्षण कालावधीत विवाह / गरोदरपण असल्यास प्रशिक्षण पुर्ण करणे हि प्रशिक्षणार्थींची जबाबदारी राहील.

४) विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कालावधीत वारंवार सुट्टीवर जाऊ नये व पालाकांनी त्यासाठी दबाव आणू नये.

५) विद्यार्थी प्रशिक्षण कालावधीत कोणत्याही कारणास्तव लेक्चरला गैरहजर असल्यास तसेच परिक्षेसाठी उपस्थितीचे दिवस कमी पडत असतील तर तिला महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ नियमानुसार परिक्षेला बसता येणार नाही.

६) भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांनी नेमून दिलेल्या अभ्यासक्रमाच्या नियमांचे पालन विद्यार्थ्यांनी काटेकोरपणे करणे आवश्यक आहे.

७) शैक्षणिक सहली,भेटी, ग्रामिण अनुभव, आऊटपास इ. साठी बाहेर गेल्यावर एखादी दुर्घटना घडल्यास त्यास संस्था जबाबदार राहणार नाही.

८) प्रशिक्षणा दरम्यान विद्यार्थ्यांनीने कोणतेही बेकायदेशीर/अनैतिक कृत्य केल्यास त्या विद्यार्थिनीवर त्याची संपुर्ण जबाबदारी वैयक्तिकरित्या राहील व तिला प्रशिक्षणातुन काढण्यात येईल. तसे अधिकार संस्थाप्रमुखांना असतील.

- मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.०२/०४/२००८ च्या आदेशान्वये लिंगडोह समितीच्या रॅगिंग विरोधी शिफारसीनुसार तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.१४.१२.२००९ च्या नियमानुसार रॅगिंग प्रकरणात कार्यवाही करण्यात येईल.
- प्रशिक्षणार्थी/ विद्यार्थी रॅगिंगच्या कृत्यामध्ये दोषी आढळल्यास त्याला निलंबित केले जाईल.तसे शपथपत्र लिहुन घेतले जाईल.

- खालील प्रमाणे रॅगिंग विरोधी समिती गठीत आहे.

| | |
|---|---|
| जिल्हा शल्य चिकित्सक | अध्यक्ष |
| अधिसेविका | सदस्य |
| परिचर्या अधिकारी/प्राचार्य | सदस्य सचिव |

- नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना उपरोक्त समिती सदस्यांचे दुरध्वनी क्रमांक दिले जातील.

महाराष्ट्र शासनाच्या सन १९९९ च्या रॅगिंग विरोधी कायद्याचे पालन करणे सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना बंधनकारक राहिल.

९) विद्यार्थ्यांच्या अतंर्गत मुल्यांकनाकरीता वेळोवेळी चाचणी परिक्षा, केसस्टडी, केस प्रेझेंटेशन , नर्सिंग केअर प्लान, प्रात्यक्षिक परिक्षा इत्यादी घेतल्या जातील, त्या वेळोवेळी पुर्ण करणे बंधनकारक राहील. त्यामध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, अन्यथा अंतिम परिक्षेस बसता येणार नाही.

१०) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी दर ६ महिन्यांनी एक या प्रमाणे एका शैक्षणिक वर्षात किमान २ पालक सभा घेण्यात येतील. यासाठी पालकांनी उपस्थितीत राहणे आवश्यक आहे.

११) विना परवानगी घरी राहील्यास १ दिवस गैरहजेरीसाठी १:१ याप्रमाणात वार्षिक रजा कपात करण्यात येईल.

१२) मंजुर सुट्टीपेक्षा जास्त दिवस गैरहजर असल्यास पुन्हा प्रशिक्षणाकरिता हजर होताना पालकांनी स्वतः प्रशिक्षणार्थ्यास प्राचार्यासमक्ष आणुन हजर करावे.

१३) प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपला वर्ग व आजुबाजुचा परिसर स्वच्छ ठेवणे. तसेच वर्गाच्या व इमारतीच्या भिंतीवर लिखाण करु नये, रंग उडवु नये. (विशेषतः धुलीवंदनाच्या दिवशी)

१४) नेमुन दिलेल्या वॉर्ड व्यतिरीक्त इतरत्र फिरु नये. तसेच सुटटी असेल तेव्हा रुग्णालयामध्ये अथवा रुग्णालयाच्या आवारामध्ये विनाकारण फिरु नये.

१५) सर्व विद्यार्थ्यांनी वॉर्ड मधुन वेळेत क्लासरुममध्ये येण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.

१६) प्रात्यक्षिकअनुभव घेण्यासाठी कक्षात जाताना संपुर्ण गणवेशामध्येच जावे. यामध्ये सफेद सलवार कमीज, ॲप्रन, सफेद बुट, पायमोजे व पाउच मध्ये सर्व शैक्षणिक साहित्य असणे अनविार्य आहे.

१७) सर्व प्रशिक्षाणार्थ्यीचे दर महिन्याला तिस-या शनिवारी मानसोपचारतज्ञ यांचेकडुन समुपदेशन करण्यात येईल. तसेच प्रशिक्षणार्थ्यींना त्यांच्या काही वैयक्तिक बाबी तसेच कुठल्याही प्रकारची गंभीर समस्या किंवा मानसिक त्रास जाणवल्यास त्याबाबत त्यांचे आई, वडील, संस्थेतील शिक्षक किंवा मानसोपचार तज्ञ यांच्याकडुन समुपदेशन करुन घेण्यात येईल.

१८) प्रशिक्षाणार्थ्यीना प्रात्यक्षिक अनुभव, प्रशिक्षण विद्यालय तसेच वसतिगृहा संबंधित काही समस्या असल्यास त्यांनी त्वरीत संबंधित अधिका-यांशी संपर्क साधावा.

१९) विद्यार्थ्यांच्या आई वडीलांनी वेळोवेळी आपल्या पाल्यांच्या संपर्कात राहुन यशस्वीरित्या प्रशिक्षण पुर्ण करण्यासाठी त्यांचे मनोबल वाढवावे. तसेच आपल्या पाल्यांना प्रशिक्षणासंबंधित काही समस्या आहे असे आढळुन आल्यास संस्थेतील वरिष्ठ अधिका-यांशी त्वरीत संपर्क साधावा.

२०) प्रशिक्षणार्थीनी प्रशिक्षण काळात त्यांच्या वर्तणुकीमुळे शासकिय संस्थांची प्रतिमा मलिन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**१४)(ब) प्रशिक्षणादरम्यान वसतिगृहात पाळावयाचे नियम**

१) वसतिगृहाचा वापर फक्त विद्यार्थ्यीनीसाठीच आहे. इतर कोणत्याही व्यक्तींना वसतीगृहात राहण्यास सक्त मनाई आहे.

२) नातेवाईकांनी भेटावयाचे नियम.

- विद्यार्थ्याला भेटायला येणा-या नातेवाईकांची नावे, पत्ते व फोटो, आधारनंबरसहित प्रशिक्षणासाठी हजर होताना देणे आवश्यक आहे. तसेच त्याच नातेवाईकांना भेटण्यास परवानगी देण्यात येईल, त्या व्यक्तीरिक्त इतर कोणासही भेटण्यास परवानगी मिळणार नाही व यासाठी कोणाचाही दबाब आणु नये.
- नातेवाईकांनी भेटावयाची वेळ आठवडयातुन दोन वेळा सायंकाळी ४ ते ६ व रविवारी सकाळी १० ते ६ या वेळेतच विद्यार्थ्यांना प्रतिक्षा दालनात भेटता येईल.
- तसेच आठवडयातुन एक दिवस विद्यार्थ्यांना ३ तासाचा आऊट पास देण्यात येईल.
- रुग्णालय परिसरामध्ये नातेवाईकांशी बोलत बसु नये. प्रशिक्षणार्थीना वसतिगृहात भेटण्यासाठी आई वडिल व सख्खे भावंड यांनाच परवानगी असेल व प्रत्येक भेटीची नोंद रजिस्टरमध्ये घेण्यात यावी. नातेवाईकांचे ओळखपत्र तपासूनच त्यांना प्रशिक्षणार्थीना भेटण्यास परवानगी देण्यात येईल.

३) विद्यार्थ्यांना आपल्या नातेवाईकास/मैत्रिणीस वसतिगृहातील खोलीत नेण्यास सक्त मनाई आहे.

४) वसतिगृहातील टेरेसला कुलुप असावे व त्याची चावी अधिसेविका/परिचर्या अधिकारी यांच्या ताब्यात असतील .

५) वसतिगृहात विजेची शेगडी व विद्युत उपकरणे वापरण्यास सक्तमनाई आहे. प्रशिक्षणार्थीनी खोलीमध्ये कोणत्याही प्रकारची अपायकारक वस्तू ठेवू नयेत तसे आढळल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल .

६) विद्यार्थ्याला एखादा गंभीर आजार उदा. अपस्मार, हृदयरोगव त्वचेचे आजार ई.असल्यास व त्यावर औषधोपचार सुरु असल्यास विद्यार्थी व पालकांनी प्रवेशाच्यावेळी संस्थेला तसे अवगत करावे.

७) आजारी विद्यार्थ्यांने वेळेत वर्गशिक्षक,सार्वजनिक आरोग्य परिचारीका, वॉर्डन यांना सुचित करुन उपचार करुन घ्यावे. विद्यार्थ्यांनीला ॲडमीट केल्यास पालकांना बोलविण्यात येईल. पालकांनी त्वरीत आपल्या पाल्याला भेटण्यास यावे.

८) सांसर्गिक रोग झाल्यास वसतिगृहातुन उपचारासाठी घरी पाठविण्यात येईल व रोग बरा झाल्याचे वैद्यकिय अधिका-याचे पत्र असल्याशिवाय हजर करुन घेतले जाणार नाही.

९) प्रशिक्षण काळात वैयक्तिक साहित्याची चोरी किंवा आपापसात झालेल्या भांडणाची पोलीस तक्रार वरिष्ठांच्या परवानगी शिवाय करता येणार नाही.

१०) काही कारणास्तव रुम बदलावयाची असल्यास तसे वॉर्डनला लेखी अर्ज करुन बदलुन घेता येईल.

११) वसतिगृहातील रिक्त खोल्यांना तसेच विनावापर खोल्यांच्या,अभ्यागत कक्ष ( व्हिझीटींग रुम) तसेच चेंजिंग रुम यांना रात्री ८ नंतर कुलुप लावावे व त्यांच्या किल्ल्या वार्डनच्या ताब्यात असतील .

१२) रात्री १० वाजता वॉर्डन व कार्यरत नाईट सुपर हया वसतिगृहात राऊड घेतील व सर्व विद्यार्थ्यीनी सुखरुप आहेत हे पहातील . तसेच आठवडयातुन एक दिवस वॉर्डन व सहाय्यक अधिसेविका यांनी प्रशिक्षणार्थींच्या वसतीगृहातील खोल्यांची तपासणी करतील .

१३) सुरक्षिततेच्या कारणास्तव वसतिगृहाच्या आवारात (प्रवेशद्वार, अभ्यागत कक्ष, मेस व जेवणाची खोली, प्रत्येक मजल्यावरील व्हरांडा इ.) सी.सी.टी.व्ही. कॅमे-याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

१४) वसतिगृहामध्ये तक्रार पेटी ठेवण्यात आलेली असून प्राप्त झालेल्या तक्रारीचे निवारण समितीमार्फत वेळोवेळी निवारण करण्यात येईल .

१५) वसतिगृहामध्ये प्रशिक्षणार्थीशी संबंधित असलेल्या नोंदी (आहार पुस्तक, हजेरी पुस्तक, आऊट पास व नाईट पास यांचे पुस्तक, पालक भेटीचे पुस्तक, जमा खर्चाचे पुस्तक इत्यादी) वॉर्डन वेळोवेळी अद्यावत करतील .

१६) वसतिगृहामध्ये कुठेही तोडफोड / नासधुस केल्यास सक्त कारवाई करण्यात येईल.

१७) वसतिगृहात कोणत्याही स्वरुपाचा गोंधळ करु नये.

१८) वसतिगृह आपले असल्यामुळे स्वच्छता ठेवावी. बाथरुम तुंबणार नाही याची काळजी घ्यावी.

१९) पाण्याचा व विजेचा वापर काटकसरीने व आवश्यक तेवढाच करावा. काम झाल्यावर नळ, पंखा व लाईट बंद करावेत.

२०) **१५ (क )मेसमध्ये पाळावयाचे नियम.**

१) सकाळी ७ ते ७:३० या वेळेत चहा नाश्ता मिळेल.

२) दुपारी ठरवुन दिलेल्या वेळेत (१२ ते १) जेवण मिळेल.

३) संध्याकाळचा चहा ४ ते ५ या वेळेत मिळेल.

४) रात्रीचे जेवण संध्याकाळी ७ ते ८ यावेळेत मिळेल.

५) जेवण आहारगृहातच करावे. रुमवर जेवण घेऊन जाऊ नये.

६) आवश्यक असेल तेवढेच अन्न वाढुन घ्यावे. अन्न वाया घालवु नये.

७) मेस फी दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत मेस क्लब मध्ये जमा करावी.

**१६) विद्यार्थ्यांचे स्थानांतर:-**

एका संस्थेत प्रवेश दिल्यानंतर प्रशिक्षण पुर्ण, होईपर्यंत कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना दुस-या संस्थेत स्थानांतर करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**१७) विशेष सुचना:-**

- उमेदवाराना प्रवेशाच्या वेळी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित (ॲटेस्टेड) सत्यप्रती सादर कराव्यात. मुळ प्रमाणपत्रे प्रवेशाच्या वेळी पडताळणी करिता संस्थाप्रमुखांना सादर करावीत. मुळ प्रमाणपत्रे व गुणपत्रिकांच्या छाननी किंवा पडताळणीच्या वेळी कोणत्याही त्रुटी, चुकीची माहिती किंवा गुणपत्रिकेत अनधिकृत खाडाखोड अथवा बदल केल्याचे आढळुन आल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज तात्काळ नाकारण्यात येईल. किंबहुना त्याला आधिच प्रवेश देण्यात आला असल्यास तो रद्द करण्यात येईल. प्रवेशित विद्यार्थ्यांचे मुळ प्रमाणपत्रे हे कार्यालयात प्रशिक्षण पुर्ण होईपर्यंत जमा करुन घेण्यात यावीत. याची नोंद प्राचार्यानी घ्यावी.प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर सर्व प्रमाणपत्रे परत करुन पोच घ्यावी.

- प्रवेशासाठी केलेल्या दाव्यानुसार आवश्यक असलेली सर्व प्रमाणपत्रे प्रवेशाच्यावेळी सादर करण्यात यावी. प्रवेश अर्जात केलेल्या दाव्या व्यतिरिक्त नंतर केलेला कोणताही दावा विचारात घेण्यात येणार नाही.
- ज्या संस्थते उमेदवाराने प्रवेश अर्ज केलेला असेल, त्याच संस्थेत त्याची वैद्यकिय तपासणी केल्यानंतरच उमेदवार प्रशिक्षणासाठी पात्र ठरेल. वैद्यकिय तपासणीत उमेदवार शारीरिक व मानसिकदृष्टया अपात्र ठरल्यास प्रशिक्षणातुन काढुन टाकण्यात येईल. सदर तपासणी संस्था प्रमुखांनी प्रवेशानंतर एक महिन्याच्या आत करुन घेणे बंधनकारक राहील.
- संस्थेत प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थी प्रशिक्षण अर्धवट सोडुन गेल्यास शैक्षणिक वर्षाच्या मध्यावर प्रवेश बंद दिनांकानंतर रिक्त जागा भरण्याकरीता दुस-या उमेदवारास प्रवेश देणे शक्य नसते. त्यामुळे शासकिय संस्थेतील जागा रिक्त राहिल्याने पात्र व होतकरु उमेदवाराचे नुकसान होते.यास्तव,प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षण सोडुन गेल्यास व कोणत्याही कारणास्तँव प्रवेश रद्द केल्यास **लॅप्स ऑफ सीट चे रु.५०,०००/-** इतके शुल्क आकारण्यात येईल.व त्याची शासकिय पावती देण्यात येईल. याची सर्व उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी.

***************************

9V



## CERTIFICATE OF MEDICAL FITNESS

This is to certify that I have conducted clinical examination ofKum. ........................................................................................ whois desirous of admission to Nursing courses

He/she has not given any personal history of any disease incapacitating him/her to undergo the professional course. Also, on clinical examination it has been found that he/she is medically fit to undergo said course.

a) Absence of any incapacitating and /or progressive systemic disease / disorder/ condition,
b) Absence of any disability of upper limb/s,
c) Absence of any major visual/auditory disability,
d) Absence of psychosis/neurosis/mental retardation,
e) Ability to maintain erect posture,
f) Reasonable manual dexterity.

<table>
<tr><td rowspan="4">Adress of the Registered Medical Practitioner<br><br><br><br>Date - / /2025</td><td>Signature</td></tr>
<tr><td>Name</td></tr>
<tr><td>Registration No</td></tr>
<tr><td>Seal of Registered Medical Practitioner</td></tr>
</table>

Note:

A candidate must be medically fit to undergo Fellowship/Certificate Course applied for. The medical fitness must be certified by a Registered Medical Practitioner in the prescribed Performa, as given above on a Letter head.